# रामरंगी



(छायाचित्र जालावरून साभार)

गेल्या सत्तर वर्षांत भारतीय रागसंगीताला संपूर्ण विश्वात मानाचे व आदराचे स्थान मिळवून देणाऱ्या महान साधक संगीतकारांमधील एक महत्त्वाचे नाव म्हणजे पद्मविभूषण पंडित राम नारायण!

ह्या नावाचा उच्चार होताक्षणीच विलक्षण सुरेल आणि तेजस्वी अशी सारंगी आपल्या मनात उमटते! सारंगी सारख्या अतिशय समृध्द परंतु अत्यंत अवघड वाद्यावरील पं. राम नारायण यांनी केलेली "न भूतो न भविष्यति" कामगिरी हा जगभरातील संगीतरसिकांच्या तसेच संगीतकारांच्या कौतुकाचा व आदराचा विषय आहे.

कंठसंगीताशी अधिकाधिक जवळीक साधण्याच्या सारंगीच्या क्षमतेमुळे गाण्याच्या संगतीसाठी तिचा वापर नेहमीच होत आला आहे. परंतु शेकडो वर्षांपासून हे अस्सल भारतीय पारंपारिक वाद्य दुर्लक्षितच राहीले होते. गाण्याची संगत करणारे संगतीचे वाद्य अशा दुय्यम, मर्यादीत भूमिकेत सारंगी अस्तित्त्वात होती. तसेच, ज्या काळात पंडितजींच्या हातात योगायोगाने सारंगी आली त्या काळात संगीताला सामाजिक प्रतिष्ठा नव्हती. सारंगीसारखे वाद्य तर अप्रतिष्ठित समाजातील नाच-गाण्याबरोबर वाजणारे वाद्य असा बदनामीचा व अपवित्रतेचा शिक्का बाळगून होते. अशा वातावरणात, ह्या उपेक्षित वाद्याच्या खऱ्या गुणवत्तेची जाणीव उदयपूर सारख्या एका छोट्या गावात, एका गरीब परंतु सुसंस्कृत कुटुंबात जन्मलेल्या एका असामान्य प्रतिभेच्या किशोरवयीन मुलाला व्हावी, तसेच "माझ्या सारंगीचा सूर हा मंदिराच्या गाभाऱ्यातून आल्यासारखा वाटला पाहिजे" असा ध्यास त्याने घ्यावा, ही केवळ दैवी योजनाच असू शकते!

लहान वयातच सारंगीवर अभूतपूर्व प्रभुत्व मिळवून पंडितजी वयाच्या १६व्या वर्षी लाहोर रेडियोवर सारंगीवादक म्हणून रुजू झाले. लवकरच देशातील सर्व मोठ्या गायकांना अद्भुत संगत करणारा सारंगीया असा लौकिक त्यांना प्राप्त झाला. फाळणीनंतर दिल्ली व त्यानंतर १९४९ मध्ये त्यांनी मुंबई गाठली. आघाडीच्या गायकांना उत्तम संगत करणारे अत्यंत यशस्वी संगतकार म्हणून लोकप्रिय असताना देखील सारंगीचा विकास हेच त्यांचे एकमेव ध्येय होते. त्यांना जाणवत होते की सारंगी मध्ये अजून खूप काम करण्यासारखे होते व संगतकाराच्या भूमिकेत राहून ते करणे शक्य नव्हते. आर्थिक पाठबळ नसताना, सर्व सुरक्षितता झुगारून देऊन, संगत न करण्याचा निर्णय घेउन, सारंगीला एकलवाद्याचा दर्जा प्राप्त करुन देण्यासाठी त्यांनी जी मेहनत घेतली त्यास तोड नाही. ह्याच ध्यासापायी फिल्म संगीतात अप्रतिम कामगिरी बजावून यशाच्या शिखरावर असताना त्या क्षेत्रापासून देखील ते वेगळे झाले. असे निर्णय केवळ उच्च कोटीचे साधकच घेऊ जाणे!

त्यांच्या सारंगीचा अलौकिक पवित्र सूर, चारही सप्तकांत होणारा सर्वांगसुंदर, लयदार, शिस्तबध्द, सर्जनशील रागविस्तार, वीजेच्या चपळाईने येणाऱ्या दाणेदार ताना ही सारंगीची नवीन ओळख बनली. त्यापूर्वी सारंगीवर इतक्या प्रकारचे इतके दर्जेदार काम होऊ शकते ह्याची कल्पना करणे देखील कोणाला शक्य झाले नव्हते. सखोल चिंतन, स्वतंत्र संशोधन, अपरिमित कष्ट आणि ह्या सगळ्याच्याही पलिकडे जाऊन सारंगी आणि सूर-लयीवरील अपार भक्ती ह्या बळावर जिथे साधी पायवाटही नव्हती तिथे त्यांनी सारंगीसाठी राजमार्ग निर्माण केला. सारंगी वादनाचा एक अत्युच्च मानदंड तयार करुन जगभरातील नामांकित शास्त्रीय कलमंचांवरती एक परिपूर्ण शास्त्रीय एकलवाद्य म्हणून सारंगीला मानाचे स्थान मिळवून दिले.

सारंगीवादनाच्या तंत्राबद्दलच्या त्यांच्या कार्याची तुलना करायची झाली तर सुप्रसिद्ध पाश्चात्य व्हायोलिन वादक पागानिनी ह्यांच्या कार्याशी करावी लागेल. पंडितजींनी सारंगीवादनात डाव्या हाताचा व उजव्या हाताने वाजणाऱ्या गजाचा जो अतिसूक्ष्म विचार केला आहे त्याची सखोल जाण पाश्चात्य देशांमधे आहे. पाश्चिमात्य शास्त्रीय संगीतात गजाने वाजणारी अनेक वाद्ये असल्यामुळे पाश्चात्य व त्यातही युरोपीयन संगीतप्रेमींना अशा वाद्यांचे तांत्रिक बारकावे उत्तम समजतात व ह्याचमुळे ह्या देशांमधील मोठमोठ्या दिग्गज संगीतकारांच्या मनातदेखील पंडितजींबद्दल नितांत आदर आहे.

जगद्विख्यात व्हायोलिन वादक सर येहुदी मेन्युहिन हे पंडितजींचे मित्र होते. त्यांच्या शब्दांत ...
"The Sarangi remains not only the authentic and original Indian bowed instrument, but the one, which most poignantly and in the hands of Ram Narayan most

revealingly, expresses the very soul of Indian feelings and thought. I cannot separate the Sarangi from Ram Narayan, so thoroughly fused are they, not only in my memory, but in the fact of this sublime dedication of the great musician to an instrument which is no longer archaic because of the matchless way he has made it speak." Sir Yehudi Menuhin.
केवळ पंडित राम नारायणजींच्या प्रयत्नांमुळे आज सारंगी मोठ्या सन्मानाने जागतिक स्तरावर लोकप्रियता अनुभवते आहे.

आज वयाची ब्याण्णव वर्षे पूर्ण झाली असतानादेखील त्यांचे मन सतत सारंगी व संगीतविषयक विचारांमध्ये गुंतलेले असते. गेली २० वर्षे त्यांच्याकडे सारंगी शिकणारी त्यांची शिष्या ह्या नात्याने मी अनुभवते आहे की ज्या गांभीर्याने व श्रद्धेने त्यांनी संगीतसाधना केली आहे त्याच मार्गावर सारंगी शिकणाऱ्यांची वाटचाल व्हावी, सारंगीचे मोठ्या कष्टाने निर्माण केलेले स्थान टिकून रहावे ह्यासाठी आजही ते अथक परिश्रम घेत आहेत. त्यांची कॅनडास्थित कन्या, विदुषी अरुणा नारायण कल्ले व नातू हर्ष नारायण हे दोन उत्तम सारंगीवादक तयार झाले आहेतच. इतरही काही मोजक्या शिष्यांना ते विद्यादान करत असतात. त्यांचे मोठे चिरंजीव पं. ब्रिजनारायण ह्यांनी सरोद ह्या वाद्याची निवड केली असली तरी वडिलांचीच सांगितीक मूल्ये आत्मसात करून भारतातील उच्चतम सरोदवादकांमध्ये स्थान प्राप्त केले आहे.

आज सारंगी लोकप्रिय असल्याने अनेक संगीतसभांमधून सारंगीवादक मंचप्रदर्शन करताना आढळून येतात पण बहुतेक वेळा त्यांचा सारंगीकडे व संगीताकडे बघण्याचा दृष्टिकोन पंडितजींना व्यथित करतो व सारंगीची परत घसरण होण्याची लक्षणे त्यांना अस्वस्थ करतात. प्रखर सूरसाधना, प्रगत तंत्र, रागाची शुध्दता, सूक्ष्म लयविचार व सारंगीवर पराकोटीची भक्ति ह्या पायावरच सारंगीवादन उभे असले पाहिजे असा आग्रह धरणाऱ्या पंडितजींची धारणा आहे की शास्त्रीय संगीत हे केवळ मनोरंजनासाठी नसून मुख्यत्वेकरून आत्मिक पोषणासाठी आहे. त्याची तपस्या अध्यात्मिक वाटेने झाली तरच त्याचा अपेक्षित परिणाम होऊ शकतो.

पंडितजींचे अनन्यसाधारण योगदान, म्हणजेच त्यांची रामरंगी सारंगी, संपूर्ण विश्वातून अखंड गुंजत राहो, सर्व संगीतप्रेमींना तृप्त करत राहो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना!

**- वासंती श्रीखंडे**